महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५

ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक : क्रमांक:१०/तंशिसं/पदविका प्रवेश/प्रमाणपत्रे सुट/२०२३/५५५ दिनांक : 7 JUL 2023

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांना लागणारी विविध प्रमाणपत्रे सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत**

संदर्भ: शासन पत्र क्रमांक: मान्यता-२०२३/(प्र.क्र.८२/२३)/तांशि-५, दिनांक ०७ जुलै, २०२३

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता इयत्ता दहावीनंतरचे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम, इ.बारावीनंतरचे औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, सरफेस कोटींग तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम आणि बारावी/आयटीआय नंतरचे थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम असे पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशप्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे आणि अर्ज निश्चित करणे या प्रक्रिया माहे जून २०२३ पासून सुरु आहे. सदर प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज सादर करतांना उमेदवारांना आवश्यक प्रमाणपत्रे मिळण्यास विलंब होत असल्यामुळे उमेदवार अर्ज सादर करु शकत नाही, असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अर्ज नोंदणी करण्यास दोनदा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. अद्यापही नोंदणी केलेले बरेचसे उमेदवार हे आवश्यक प्रमाणपत्रे मिळालेली नसल्यामुळे अर्ज निश्चित करु शकलेले नाही, असे दिसून येत आहे.

त्यामुळे संदर्भीय शासन पत्रान्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांना लागणारी जात/ जमात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला ही प्रमाणपत्रे सादर करण्यास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील द्वितीय फेरीच्या प्रवेश निश्चितीच्या अंतिम दिनांकापर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने उमेदवारांनी खालील बाबींची नोंद घ्यावी.

१. SC, ST, VJ/DT- NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC, EWS and TFWS या प्रवर्गातील उमेदवार नोंदणीच्या वेळी व ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे कागदपत्रांच्या पडताळणीच्यावेळी आणि प्रवेश निश्चितीच्यावेळी जात/जमात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला यापैकी त्यांना लागू असलेली प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यामुळे सादर करु शकत नसतील, तर असे उमेदवार संबंधित प्रमाणपत्राऐवजी संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाची पावती अपलोड/सादर करु शकतील. याबाबत उमेदवारांना संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाच्या पावतीसह सोबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२. ज्या उमेदवारांनी यापूर्वी सदर प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यामुळे सर्वसाधारण प्रवर्गामधून अर्ज निश्चित केलेले आहेत, अशा उमेदवारांकडे जर आता संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाची पावती उपलब्ध असेल तर असे उमेदवार त्यांच्या लॉगिन मधून ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे सदरची अर्जाची पावती अपलोड करु शकतील. सदर पावती अपलोड केल्यानंतर त्यांनी पुन्हा ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत याद्वारे अर्ज पडताळणी करणे आवश्यक आहे.

३. उपरोक्त १ व २ मध्ये नमुद केल्यानुसार जे उमेदवार संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाची पावती अपलोड/सादर करतील, अशा उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीकरीता संस्थेमध्ये उपस्थित राहण्यासाठी घोषित केलेल्या शेवटच्या दिवसापर्यंत लॉगिनद्वारे जात/जमात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला यापैकी त्यांना लागू असलेली प्रमाणपत्रे अपलोड करणे व ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे पडताळणी करणे आणि ती मुळ प्रमाणपत्रे उमेदवारांने प्रवेश घेतलेल्या संस्थेमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

४. उपरोक्त ३ मध्ये नमुद केल्यानुसार जे उमेदवार कार्यवाही करु शकणार नाहीत, अशा उमेदवारांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत संस्थेमधील झालेला प्रवेश (कॅप मधील) आपोआप रद्द होईल. त्यास सर्वस्वी संबंधित उमेदवार जवाबदार राहतील. याबाबत संचालनालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. अशा उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार मानले जाईल व जर असे उमेदवार सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठीचे पात्रता निकष पुर्ण करीत असतील तर त्यांना पुढील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीमध्ये सहभाग घेता येईल. तसेच असे उमेदवार संस्थास्तरीय जागांवरील प्रवेशासाठीदेखील पात्र राहतील. अशा उमेदवारांना स्वत: संस्थास्तरीय जागांवरील प्रवेशासाठी संबंधित संस्थेकडे स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल व त्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे लागेल.

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.३ मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना

# हमीपत्र

(संदर्भ: तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक:१०/तंशिसं/पदविका प्रवेश/प्रमाणपत्रे सुट/२०२३/५५५, दि.०७/०७/२०२३)

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------ Application ID : ------------------ माझ्या इ.१० नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका/थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका/ इ.१२ नंतरच्या प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र/एचएमसीटी/सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रवेश प्रक्रियेकरीता अर्ज नोंदणी करतांना नोंदणीच्या वेळी व ई-स्क्रूटनी पध्दत/प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे कागदपत्रांच्या पडताळणीच्यावेळी/प्रवेश निश्चितीच्यावेळी **जात/जमात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला** (लागू नसेल ते खोडावे) ही मूळ कागदपत्रे समुचित प्राधिकरणाकडून प्राप्त न झाल्यामुळे संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाची पावती क्र.------------- दि.---------- अपलोड/सादर करीत आहे.

मी तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक: १०/तंशिसं/पदविका प्रवेश/प्रमाणपत्रे सुट/२०२३/५५५, दि.०७/०७/२०२३ पूर्णपणे वाचले आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीकरीता संस्थेमध्ये उपस्थित राहण्यासाठी घोषित केलेल्या शेवटच्या दिवसापर्यंत लॉगिनद्वारे जात/जमात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला (लागू नसेल ते खोडावे) ही प्रमाणपत्रे अपलोड करणे व ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे पडताळणी करणे आणि ती मुळ प्रमाणपत्रे उमेदवारांने प्रवेश घेतलेल्या संस्थेमध्ये सादर करणे आवश्यक आहे, याची मला संपूर्ण जाणीव आहे. जर मी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीकरीता संस्थेमध्ये उपस्थित राहण्यासाठी घोषित केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत सदर मूळ प्रमाणपत्र अपलोड/सादर करु शकलो / शकले नाही तर माझा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत संस्थेमधील झालेला प्रवेश (कॅप मधील) आपोआप रद्द होईल व त्यास सर्वस्वी मी स्वत: जवाबदार राहील, याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

ठिकाण:

दिनांक:

उमेदवाराची स्वाक्षरी : पालकाची स्वाक्षरी:

उमेदवाराचे नाव : पालकाचे नांव :